सकाळ
औरंगाबाद
बुधवार
१० डिसेंबर
२००३

# आयएसओ ‘रुजवणारी’ माणसं...



विलास कुलकर्णी

**झेप**

दत्ता जोशी
dattjoshi@yahoo.com

काही माणसं वेगळ्या ट्रॅकवर धावत असतात. एखाद्या सामान्य कुवतीच्या माणसाला जे ओझं असह्य होईल, ते ही माणसं लीलया पेलत असतात. 'ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट थ्रु इंप्रुव्हड् सिस्टिम्स' हे ब्रिद घेऊन 'एच.आर इन्कार्पोरेशन' या नावाने ह्यूमन रिसोअर्स डेव्हलपमेंटच्या क्षेत्रात स्वतःला वेगळी ओळख निर्माण करत दमदार वाटचाल करीत असलेल्या विलास कुलकर्णी यांच्याबद्दल असेच काहीसे म्हणावे लागेल.

साधारण १९९२ च्या दरम्यान मुक्त अर्थव्यवस्थेच्या लाटेत भारतात ‘आयएसओ’ मानकाची संस्कृती येऊन पोचली. विशेषत्वाने परदेशात उद्योगाला पोचवायचे असेल तर त्या त्या क्षेत्रातील ही मानके मिळविणे ही गरज बनली. या मानकांसंदर्भात भारतात सुरु झालेल्या जागृतीच्या अगदी पहिल्या टप्प्यापासूनचे साक्षीदार असलेले कुलकर्णी आज सर्व क्षेत्रातील अशा मानकांच्या पूर्ततेसाठी सल्लासेवा देतात.

ते मुळचे सोलापूरचे. १९८७ मध्ये बारावीची परीक्षा दिली. उपलब्ध मेडिकल ॲडमिशनचा मोह टाळला. मूळ पिंड संशोधक - विश्लेषकाचा. सरळ बी. एसस्सी. ला ॲडमिशन घेतली. ग्रॅज्यूएशनच्या या तीन वर्षांचा उपयोग त्यांनी ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्यासाठी केला. देश-विदेशातील असंख्य नियतकालिकांचे ते वर्गणीदार झाले. समग्र वाचन केलं. सायंटिफिक, जिऑग्रॉफिकल व न्यूज जर्नल्स एवढेच काय, अगदी एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाचे सगळे खंड विश्लेषणात्मक दृष्टीतून हाताळले. रस मॅनेजमेंट रिसर्चमध्ये होता, पण विशिष्ट दिशा देणारं, गाईड करणारं कुणी नव्हतं. त्यामुळे स्वैर संचार सुरु होता. यामुळे फायदा हा झाला, की जग किती मोठं आहे, कुठल्या विषयाला किती स्कोप आहे, याची यथार्थ जाणीव झाली.

कॉलेजात तत्वज्ञानापासून साहित्यापर्यंत सर्व विषयांच्या तासाला उपस्थिती असायची. यातून ज्ञानप्राप्तीची एक ‘सायकल’ पूर्ण झाली. विज्ञान, कला व वाणिज्य हे तीनही अभ्यासक्रम पूर्ण केले. या नंतर ‘ह्यूमन रिसोअर्स डेव्हलपमेंट’ आणि ‘पॉलिसी स्टडीज’ ही थीमलाईन घेऊन पोस्ट ग्रॅज्यूएशन, एम. फिल. आणि पीएच. डी.साठी संशोधन केले.

याच काळात आयुष्याच्या उभारणीचे विचारचक्रही सुरु होते. नोकरी करायची नाही आणि मॅनेजमेंट रिसर्च हा विषय सोडायचा नाही हे त्यांनी पक्कं ठरवलं. कार्यक्षेत्र निवडण्याचा प्रश्न आला, तेव्हा पुण्यातील या क्षेत्रातील बजबजपुरी आणि मुंबईचे अतिवेगवान लाईफस्टाईल नकोसे वाटल्याने त्यांनी मराठवाडा प्रिफर केला. त्यांच्याच शब्दात सांगायचं, तर मराठवाड्यात ‘व्हर्जिन मार्केट’ होतं.

साधारण दहा वर्षांपूर्वी, १९९३ मध्ये जालन्यात कामाला सुरवात केली. तेथे कुमार देशपांडे यांच्या बरोबर काम केले. त्यांच्या मार्फत ‘निर्लेप’ च्या मुकुंद भोगले यांची ओळख झाली. निर्लेपमध्ये त्यांनी काही नव्या कल्पना श्री. कुलकर्णी यांच्यामार्फत रुजविल्या. तोच प्रयोग लगेचच ‘औरंगाबाद निर्लेप’ मध्ये भोगले ब्रदर्समध्येही झाला. तेथेही यश मिळाले. याच बरोबर आयएसओ प्रशिक्षाचे विविध कार्यक्रम विदर्भापासून कोकणापर्यंत घेतले. त्यानंतर त्यांना मागे वळून पाहावे लागले नाही.

पण विलास कुलकर्णी नेमकं काय करतात? खरं सांगायचं, तर ते काहीच करत नाहीत! ते तुमच्याकडून त्यांना हवं तसं करवून घेतात. ‘कागदपत्रांचे फायलिंग करुन गुणवत्ता सिद्ध होत नसते, ती तुमच्या दैनंदिन कामांतून - व्यवहारातून प्रगटावी लागते, त्यासाठी व्यवस्थापनाचा दृष्टीकोन बदलला पाहिजे’, हा त्यांचा आग्रह असतो. प्रत्येक ठिकाणची एक संस्कृती असते. व्यवस्था असते. त्याला धक्का बसू न देता, तेथील प्रत्येक गोष्टीचे; कोणतेही पूर्वग्रह न ठेवता, ते विश्लेषण करतात. ‘बेसिक सिस्टीम’ सुधारली, की उत्तम रिझल्ट मिळू लागतात. श्रेय कुलकर्णींना जाते, पण कुलकर्णी यांनी त्या ठिकाणच्या, त्याच माणसांमधील सुप्त शक्तीचा फक्त विकास केलेला असतो. हेच ‘ह्यूमन रिसोअर्स डेव्हलपमेंट.’

गेल्या दहा वर्षांत त्यांनी सर्व क्षेत्रे हाताळली. अभियांत्रिकी, फार्मास्युटिकल्स, बायोटेक्नॉलॉजी, हॉस्पिटल्स, टेक्स्टाईल्स, केमिकल इंडस्ट्री, शेती, फुड प्रोसेसिंग, साखर कारखाने, डेअरी, शिक्षणसंस्था, माहिती तंत्रज्ञान उद्योग, बँका आणि वित्तसंस्था, सरकारी उद्योग, अगदी लॉंड्री देखील! प्रत्येकाची मानके वेगळी, कौशल्य वेगळे. इथे त्यांना त्यांच्या अफाट वाचनाचा उपयोग झाला, तसा त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ पदरी असल्याचाही झाला. या प्रत्येक विषयाचा तज्ज्ञ त्यांच्याकडे काम करतो. नाव ‘नोकरी’, पण वागणूक बरोबरीची! वेतन भरपूर आणि प्रत्येकाच्या विकासाला, कर्तृत्वाला भरपूर वाव आणि मोकळीक. संस्था मग ‘आपोआपच’ मोठी होते! मोकळ वेळ असेल, तर समोर काम टाकले जात नाही. त्या वेळेत त्याने इकॉनॉमिक टाईम्स वाचावा, बिझनेस इंडिया चाळावा, नवे ज्ञान मिळवावे, ही अपेक्षा!

कसल्याही गैरव्यवहाराला थारा नाही, हे इथले महत्त्वाचे वैशिष्ट्य. ‘आयएसओ किंवा त्या दर्जाचे सर्टिफिकेट मिळवायचे, तर त्यासाठी आवश्यक असलेले सिस्टिममधील बदल करा, नियमांची पूर्तता आपोआप होईल. फक्त फायली तयार करून आयएसओ मिळवून देण्याचे काम आम्ही करणार नाही’, ही त्यांची भूमिका. ‘फक्त सर्टिफिकेटपुरते काम करू नका, खर्च तेवढाच येणार आहे, तर मग बेसिक सिस्टिम्स डेव्हलप करा, तुमचा दूरगामी फायदा होईल. शॉर्ट टर्म ॲप्रोच ठेवू नका’, हा त्यांचा सर्वांना सल्ला. तोच स्वतःच्या बाबतीतही ते अमलात आणतात. व्यवहारात एकही पैसा रोख, देत किंवा घेत नाहीत. सारे व्यवहार चेकने!

सध्या औरंगाबादबरोबरच हैदराबाद, मुंबई आणि सोलापुरात कार्यालये उघडलेल्या ‘एचआर’ ची झेप लवकरच ऑस्ट्रेलिया आणि ‘सार्क’ देशांपर्यंत पोचणार आहे. त्यासाठीच्या वाटाघाटी सुरू आहेत. आता ‘एचआर इन्कार्पोरेशन; ‘प्रायव्हेट लिमिटेड कंपनी’त रूपांतरीत झाली आहे.


क्वालिटी कन्सल्टन्सी देणाऱ्या, वेगवेगळी प्रलोभने नाकारून मनुष्यबळ विकासावर फोकस केंद्रित करून इथपर्यंत आलेल्या विलास कुलकर्णी यांनी वयाच्या पस्तीशीत जे कमावलं आहे, जे जगाच्या दृष्टीनं खूप काही आहे. मात्र त्यांच्या स्वतःच्या दृष्टीकोनातून ही सुरवात आहे.

**संपर्कासाठी : विलास कुलकर्णी, एच आर इन्कार्पोरेशन,**
**४०१, लाभ चेंबर्स, एमटीडीसीसमोर, स्टेशन रोड, औरंगाबाद.**
**फोन : ०२४०-५६२३७१४,**
**मोबाईल -९४२२२-११४७३, ९८२३०-७३७१४**
**वेबसाईट - www.hrinc.org ई मेल-vilas@hrinc.org**

### या प्रमाणपत्रांसाठी ‘एचआर’ सेवा देते

- ISO 9000 - गुणवत्ता व्यवस्थापन
- ISO 14000 - पर्यावरण व्यवस्थापन
- QS 9000, ISO/TS 16949 - फोरव्हिलर ऑटोमोबाईल इंडस्ट्री आणि त्यांचे सप्लायर्स
- ISO/IEC 17025 (NABL) - कॅलिबरेशन अँड टेस्टिंग लॅबोरेटरीज (प्रामुख्याने पॅथॉलॉजी लॅबोरेटरी)
- WHO-GMP - फार्मास्युटिकल्स अँड रिलेटेड इंडस्ट्रीज
- CE-Marking - खेळण्यांपासून कोणत्याही वस्तूंपर्यंत
- HACCP 9000 - फूड हायजिन सेफ्टी सिस्टिम्स, हॉटेल
- EUREPGAP- BRC - शेतीविषयक प्रमाणपत्र • BHC - हॉटेल
- Behavirol & technical training.

### ‘इआरपी सॉफ्टवेअर’ चार वर्षांपूर्वीच!



गेल्या ४-५ वर्षांत ‘एचआर’ ने सॉफ्टवेअरच्या क्षेत्रातही प्रवेश केला होता. सध्या विलास कुलकर्णी यांच्या पत्नी सुप्रिती कुलकर्णी हे काम पाहतात. (त्याच ‘एचआर’चे ॲडमिनस्ट्रेशनही सांभाळतात) त्यांनी चार वर्षांपूर्वीच ‘इआरपी’ सॉफ्टवेअर डेव्हलप केले होते. मात्र तेव्हा त्यांचा भर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटवर नव्हता. ओरॅकल बेस असलेले हे सॉफ्टवेअर गेली काही वर्षांपासून हैदराबाद, बीड, सोलापूर येथील काही कंपन्यांत ते वापरात आहे. त्यांनी नुकतेच सराफांसाठीही एक सॉफ्टवेअर डेव्हलप केले आहे. त्यात, किती तारखेला दुकान बंद करताना किती रुपयांच्या किती नोटा काउंटरवर होत्या, इथपर्यंतची माहिती मिळू शकते!